# विकसित भारताचे ध्येय गाठण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा

## अमरीश कक्कड यांचे प्रतिपादन

**पिंपरी** : चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, मधील प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज, प्रतिभा ज्युनिअर कॉलेज, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज (सीबीएसई) प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल, व प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण व्यावसायिक अमरीश कक्कड यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थितांनी समुह राष्ट्रगीताचे सादरीकरण करून भारतमाताकी जयच्या धोषणा दिल्या. कक्कड यांचा सत्कार संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यासपीठावरती कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक




सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ.भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा, प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ.राजेंद्र कांकरिया, पीआयबीएमचे संचालक डॉ.सचिन बोरगावे, प्राचार्य डॉ.पौर्णिमा कदम, डॉ. वनिता कुर्हाडे, वृंन्दा जोशी उपस्थित होते. माजी सैनिक रमेश वराडे, एस.एम. भगवान उत्तेकर यांनी विशेष परीश्रम घेतले. यावेळी पालक, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्वीक हील फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या सामाजिक उपक्रमाच्या प्रकल्प समन्वयीका डॉ. हर्षिता वाच्छानी यांच्या नेतृत्वात सायबर वॉरियर्स पथकातील विद्यार्थी समाजातील सायबर सुरक्षेच्या आव्हानांना सामोरे कसे जायचे याबाबत जनजागृती करतात. त्यानी स्वातंत्र दिनाचे औच्यीत्य साधत उपस्थितांना यावेळी शपथ दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुवर्णा गायकवाड यांनी केले. पाहुण्यांचा परीचय प्रा. मनीषा पाटील यांनी तर आभार प्रा. पल्लवी चव्हाण यांनी मानले. ध्वजारोहणासाठी डॉ. आनंद लुंकड, प्रा.पांडुरंग इंगळे, प्रा. शबाना शेख, डॉ. अभय पोद्दार, संदीप शहा यांनी विशेष परिश्रम घेतले.